ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II

MARCH – APRIL 2024

Original Research Article

# रवींद्रनाथ टागोर आणि शिक्षणक्षेत्रातील शाश्वत विकास

*** डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई व ** सौ.संजना संजय भालकर**

** Principal, Aacharya Javadekar College of Education ,Gargoti, Affiliated to shivaji University Kolhapur.*

*** Ph.D Researcher, Shivaji University,Kolhapur.*

**सारांश :**

*रवींद्रनाथ टागोरांनी शैक्षणिक क्षेत्रात दिलेले आपले शैक्षणिक विचार आणि थेट प्रत्यक्षात कृतीने दिलेले अधिष्ठान अत्यंत महत्वाचे आहे.शैक्षणिक विचारधारा,निसर्गातून शिक्षण, प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण ,प्रयोग या शाश्वत विकासाच्या संकल्पना स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये रुजविण्याचे श्रेय रवींद्रनाथ टागोरांना जाते .यासाठी त्यांनी शांतिनिकेतन नावाची शैक्षणिक संस्था निर्माण केली .या संस्थेअंतर्गत विद्यार्थ्यांना आवडणारी व शाश्वत विकासाची शिक्षणव्यवस्था टागोरांनी तयार केली.*

**Keywords :** *रवींद्रनाथ टागोर, शिक्षणक्षेत्रातील शाश्वत विकास*

**Copyright © 2024 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

**प्रस्तावना :**

‘शाश्वत विकास’ हा शब्दप्रयोग विश्व पर्यावरण विकास आयोग म्हणजेच ‘ब्रूटलँड’ आयोगाने १९८७ मध्ये पहिल्यांदा वापरला आहे. या आयोगाच्या मते, सध्याच्या पिढीला गरजांची पूर्तता पुढील पिढीच्या गरजा भागविण्यासाठीच्या क्षमता अबाधित राखून करणे म्हणजे, शाश्वत विकास होय. काहींनी ‘धारणाक्षम विकास’ किंवा ‘प्रतिपालनिय विकास’ असाही शाश्वत विकासाचा अर्थ लावलेला आहे; मात्र शाश्वत विकासाची संकल्पना ही प्रथम संयुक्त राष्ट्राच्या ‘पर्यावरण व विकास’ या १९९२ च्या विश्व पर्यावरण विकास आयोगाने रीओ दे जानेरो येथील वसुंधरा परिषदेत मांडली. ज्यामध्ये शाश्वत विकास म्हणजे, ‘असा विकास की, ज्यात वर्तमान काळातील विकासासाठीच्या गरजा भागविताना भावी पिढीच्या विकासाच्या क्षमतांशी तडजोड न करणे होय.’ थोडक्यात, आपल्या विकासाच्या परिणामाची फार मोठी किंमत पुढील पिढीला मोजावी लागू नये, विकास करीत असताना लागणारे घटक योग्य प्रमाणात वापरून जतन करून संवर्धन करणे म्हणजे शाश्वत विकास होय.

रवींद्रनाथ टागोरांचे जीवन सर्वांना परिचित आहेच ,शैक्षणिक तत्वज्ञानाचे मूळ त्यांच्या बालपणीच्या शिक्षणविषयक अनुभवात आढळते .शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाची कोणतीही पदवी ते प्राप्त करू शकले नाहीत .कारण त्यांचे मन त्या साचेबंद शिक्षणपद्धतीत रमूच शकले नाही .तुरुंगाप्रमाणे चार भिंतींच्या आत भरणारे ते वर्ग ,लाकडी बाके व फळे ,वर्गातील

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

निरस व अनाकर्षक वातावरण ,हातात छडी घेतलेले शिक्षक ,मुलांना होणारी शिक्षेची भीती इ .गोष्टी पाहून लहानपणीच त्यांचे मन विटून गेले .ते बंड करून उठले ,शिक्षणासाठी इंग्लडला देखील जाऊन आले ,पण तिथे त्यांना यश आले नाही.त्यामुळे लहानपणीच त्यांच्या पित्या कडून व खाजगी शिक्षकांकडून तत्वज्ञानाचा वारसा व भावंडांकडून संगीत ,नृत्य व अभिनयादी कलांचा वारसा मिळाला .ते स्वतः. प्रतिभा संपन्न कवी होतेच .त्यामुळे कोणत्याही विषयामध्ये पदवी प्राप्त न करता देखील विश्व् विख्यात साहित्यिक म्हणून गाजलेच.आजचे शिक्षण हे जीवनापासून पूर्णपणे विभक्त झाले आहे असे वाटते,काही शाळांमध्ये आजही कृत्रिम पद्धतीने दिले जाते आज रवींद्रनाथ टागोरांची शिक्षणातील शाश्वत विकासाची संकल्पनेची गरज वाटते आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये:- प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टये पुढील प्रमाणे**

१ रवींद्रनाथ.टागोरांचे शिक्षणातील शाश्वत विकासाची संकल्पनेचा अभ्यास करणे .

२. रवींद्रनाथ टागोरांचे शिक्षणातील शाश्वत विकासातील विचारांचा अभ्यास करणे .

३ . रवींद्रनाथ टागोरांचे शिक्षणातील शाश्वत विकासातील दृष्टिकोनाचा अभ्यास करणे .

**प्रस्तुत संशोधनाचे महत्व :-** प्रस्तुत संशोधन हे उच्चं प्राथमिक व माध्यमिक शालेय स्तरावरील समस्यांचे निराकरण होण्यासाठी महत्वपूर्ण ठरेल, त्याचप्रमाणे शिक्षणातील शाश्वत विकासातील संकल्पना , रवींद्रनाथ टागोरांचे योगदान ,प्रयोग ,निसर्गातून शिक्षण ,कृती आधारित अध्ययन यांची माहिती मिळविण्यासाठी उपयुक्त ठरेल.

**संशोधनाची परिमर्यादा :-**

प्रस्तुत संशोधन हे रवींद्रनाथ टागोरांच्या शिक्षणातील शाश्वत विकास या संकल्पनेपुरतेच मर्यादित राहील .

**संशोधन पध्द्ती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने दस्तऐवजांचे विश्लेषण व सर्वेक्षण संशोधन पध्द्ती यांचा उपयोग केलेला आहे.

**विश्लेषणात्मक विषयविवेचन :-**

एकविसावे शतक हे ज्ञानाधिष्ठित समाजाचे युग आहे. ज्ञान हीच शक्ती, संपत्ती आणि ऊर्जा बनणार आहे. जगाचे अर्थकारणही ज्ञानाधिष्ठित असेल आणि अध्ययन करण्याची संघटना राष्ट्र आणि जगाची शासक असणार आहे. ज्ञानप्राप्ती किंवा ज्ञानसंग्रह, ज्ञानविश्लेषण, ज्ञानव्यवस्थापन आणि जीवनाच्या व जगाच्या विविध क्षेत्रांत संपादित ज्ञानाचा उपयोग करणे, अशी कौशल्ये शिक्षणातून व्यक्तीला मिळाली पाहिजे,त्यासाठी रवींद्रनाथ टागोरांच्या शिक्षणातील शाश्वत विकासातील योगदानाचा थोडक्यात घेतलेले विश्लेषणात्मक विषयविवेचनाचा आढावा पुढील प्रमाणे

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

**स्वातंत्र्य:-** शिक्षणाचा खरा उद्देश मानसिक स्वातंत्र्य व हे स्वातंत्र्य मुलांना स्वतंत्र वातावरणात ठेवले तरच प्राप्त होऊ शकते.चार भिंतींच्या दिलेले शिक्षण हे पिंजऱ्यातील पोपटाला दिलेल्या शिक्षेप्रमाणे असते पिंजऱ्यातील पोपट बोलू शकेल , परंतु गगनात भरारी घेण्याचे सामर्थ्य त्यांच्यात निर्माण होणार नाही. शाळेतील शिक्षणामुळे मुले ज्ञानाची पोपटपंची करू शकतील ,परंतु जीवनातील समस्यांना तोंड देण्याचे ,जीवनातील निर्भयपणे वावरण्याचे, स्वतंत्रपणे विचार करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात कसे निर्माण होणार? शाळांमधील यांत्रिक व चैतन्यहीन वातावरणाचे त्यांनी उत्कृष्ट वर्णन केले आहे .ते म्हणतात "स्वातंत्र्याचा अभाव असलेल्या आमच्या शाळा म्हणजे निवड कारखाने".

**आत्मविष्कार :-** शिक्षण म्हणजे आत्मविष्कार सर्जनशीलता व नवनिर्मितीची इच्छा ही मुलांची नैसर्गिक प्रवृत्ती असते. लहानपणी जेव्हा मुलांना अनेक प्रकारची खेळणी दिली जातात तेव्हा रवींद्रनाथाचे वडील फार रागावत अशी आहे ती खेळणी मुलांना दिली तर मुलांच्या संशोधन वृत्तीला व कल्पनाशक्तीला मुळीच वाव मिळणार नाही. निर्मितीचा आनंद ते गमावून बसतात ,त्याच विचारांचा रवींद्रनाथ यांच्यावर ही परिणाम झाला होता म्हणून निरनिराळे हस्तव्यवसाय व कला यांचा शिक्षणात अंतर्भाव करून मुलांच्या मुक्त अविष्काराला भरपूर संधी दिली पाहिजे असे त्यांचे मत होते आपल्या शाळेत बसलेल्या मुलांचे वर्णन करताना ते म्हणतात की, आपल्या शाळांमध्ये मुले ही वस्तुसंग्रहालयात जशा प्रदर्शनासाठी वस्तू ठेवलेल्या असतात तशी निर्जीवपणे बसलेले असतात व मुलांच्या त्या फुलाप्रमाणे उमलणाऱ्या सुकोमल मनावर दगड धोंड्याप्रमाणे पाठांचा मारा केला जातो. अशा निष्क्रियतेचा रवींद्रनाथांनी धिक्कार करून शिक्षणात आत्मविष्कार पूरक अशा क्रियाशीलतेचा पुरस्कार केला आहे.

**अभ्यासाचे विषय:-**

आधुनिक ज्ञानशाखांतील सगळेच विषय शांतीनिकेतन मध्ये शिकविले जातात प्रत्यक्ष कलकत्त्यातील शाळांमध्ये विज्ञान हा विषय सुरू होण्यापूर्वी रवींद्रनाथ आणि तो विषय शांतिनिकेतन मध्ये शिकवायला प्रारंभ केला .उत्कृष्ट व सुसज्य अशी प्रयोगशाळा तेथे आहे भूगोलासारखे शिक्षण सृष्टी निरीक्षणातून तर इतिहास सारखे विषय कथा व गाणी यामधून शिकवले जातात . निसर्गाच्या सानिध्यात भाषा विषय यामध्ये मातृ भाषा ,राष्ट्रीय भाषा हिंदी व आंतरराष्ट्रीय भाषा इंग्रजी निसर्गाच्या सानिध्यात गद्य व पद्य प्रभावी ठरते.रवींद्रनाथ स्वतः महान कलावंत असल्यामुळे संगीत ,नृत्य ,चित्र इत्यादी कलांना तेथील अभ्यासक्रमात फार महत्त्वाचे स्थान आहे. रवींद्रनाथ स्वतः निरनिराळ्या प्रसंगावर आधारित गीते रचत ती स्वरबद्ध करत व मुलांकडून गाऊन घेत .वेळोवेळी अनेक ऐतिहासिक व पौराणिक प्रसंगाचे नाट्यीकरण ही केले जाई .नाट्यलेखन अर्थातच रवींद्रनाथांचेच असे या कलांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनाआत्मविष्काराची भरपूर संधी मिळते व कलात्मक अभिरुचीलाही त्यांच्यात विकास होतो. शांतिनिकेतन मध्ये आणखी वैशिष्ट्य म्हणजे अभ्यासक्रमात केलेली विविध प्रकारच्या

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

हस्तव्यवसायांची योजना बागकाम, विणकाम, शिवणकाम, सुतारकाम ,चर्मकला ,पुस्तक बांधणी व खेळणी तयार करणे अशा कितीतरी व्यवसायांचे शिक्षण मुलांना दिले जाते ,त्यामुळे पुस्तकी शिक्षणावरील भर कमी होऊन क्रियाशीलतेला वाव मिळतो ,निर्माण क्षमतेचा विकास होतो .अभ्यासपूर्क कार्यक्रमांना देखील अभ्यासाइतके महत्त्व असून ते अध्यापनाचेच एक माध्यम समजले जाते १९२२ साली टागोरांनी सुरूल या गावी श्रीनिकेतन नावाची ग्रामीण संस्था स्थापन केली. खेड्यातील लोकांना शिक्षण देऊन तेथील निसर्गसंपत्तीचा उपयोग करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण करून देशाच्या भौतिक समृद्धीत भर टाकण्याचा उद्देशाने टागोरांनी ही संस्था स्थापन केली व खेड्याच्या सर्वांगीण विकासाचे कार्य सुरू केले यातून १९२४ साली त्यांना शिक्षासत्र या नावाची ग्रामीण शाळा ही स्थापन केली व तीत ग्रामविकासाला आवश्यक असणाऱ्या स्वच्छता, रोगनिवारण ,पाणीपुरवठा, झोपड्या बांधणे शेतकी व कुटीर उद्योग अशा अनेक गोष्टींचे शिक्षण प्रत्यक्ष जीवनातून देण्यास सुरुवात केली. रवींद्रनाथ हे केवळ तत्वचिंतक होते ते कृतिवीर होते आपले शैक्षणिक तत्त्वज्ञान प्रत्यक्षात उतरवून त्यांनी त्या तत्त्वांची व्यवहार्यता व उपयुक्तता सिद्ध करून दिली. रवींद्रनाथ यांनी शिक्षणाच्या सर्वच अंगावर मौलिक विचार प्रकट करून शिक्षण विषयक साहित्यात फार मोठी भर घातली आहे शिक्षण क्षेत्रात त्यांनी केलेल्या अनेक प्रयोगांमध्ये प्राचीन भारतीय दृष्टिकोन आर्वाचीन प्रगतीपर दृष्टिकोन शाश्वत विकास यांचा मनोहर मिलाप झालेला दिसून येतो. शिस्त रवींद्रनाथांच्या शिस्तीच्या कल्पना अभिनव होत्या केवळ शिक्षकांच्या आज्ञांचे पालन करणे व त्यांना भिणे म्हणजे शिक्षण नव्हे. शिस्तही मनाची वृत्ती आहे आपल्या जबाबदारीची जाणीव होऊन स्वयंप्रेरणेने मुलांनी शिस्तीचे पालन करायला हवे ती लागण्याची लादण्याची गरज पडायला नको स्वयंशासनाची ही वृत्ती ही सवय योग्य वातावरणातूनच निर्माण होते .शांतीनिकेतन मधील वातावरण अगदी मोकळे होते शाळेतील सर्व शिक्षक विद्यार्थ्यांना आपल्या मुलाप्रमाणे मायेने वागवी क्वचित प्रसंगी मुलांकडून चूक घडल्या तरी त्याबद्दल त्यांना शिक्षा होत नसे आपली चूक त्यांना कबूल करायला लावणे व पुन्हा असे होणार नाही असे आश्वासन घेणे हेच शिक्षेचे स्वरूप.

**मातृभाषेचे माध्यम**:- शांतिनिकेतन मधील शिक्षण पद्धतीचा आणखी एक महत्त्वाचा विशेष म्हणजे मातृभाषेचा अध्ययन अध्यापनासाठी वापर ज्या काळामध्ये मातृभाषेचा माध्यम तर सोडाच परंतु सुशिक्षित लोकांमध्ये मातृभाषेत बोलणे हे देखील कमीपणाचे मानले जाई. त्या काळात रवींद्र नी विद्यार्थ्यांना मातृ भाषेतून शिकवायला सुरुवात केली. यामध्येच त्यांचा शाश्वत विकासातील दृष्टिकोन किती क्रांतिकारी व प्रगतिशील होता हे सहज लक्षात येईल.

**विश्वभारती विद्यापीठ:-**

शिक्षणातील शाश्वत विकासासाठी महत्वाचा दृष्टिकोन म्हणजे विश्वभारती विद्यापीठ सतत वीस वर्षे शांतिनिकेतन मध्ये विविध प्रकारचे प्रयोग केल्यानंतर 1921 साली टागोरांनी विश्वभारती या विद्यापीठाची स्थापना केली. विश्वभारती या शब्दात

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

विश्व व भारत यांचा संगम येथे पहावयास मिळेल तो विश्वभारती भारतीय शब्दाचा अर्थ संस्कृती असाही होतो विश्वभारती म्हणजे विश्वसंस्कृती ' यत्र विश्व भवति एकनिडम 'म्हणजे सर्व विश्व जेथे येऊन मिळते हे विश्वभारती विद्यापीठाचे ब्रीदवाक्य आहे. अशा रीतीने विश्व संस्कृतीचा प्रचार व प्रसार करून विश्वऐक्याची भावना निर्माण करणे हा टागोरांचा उद्देश होता परंतु या उद्देशासोबत दुसरा एक महत्त्वाचा उद्देश विश्वभारतीच्या स्थापने मागे होता व तो म्हणजे भारतीय संस्कृतीच्या सर्व वैशिष्ट्यांचा जगाला परिचय करून देणे हा आज विश्वभारती हे जागतिक कीर्तीचे विद्यापीठ बनले असून देशोदेशीच्या विद्यार्थी येथे अभ्यास करायला येतात शांतिनिकेतन व विश्वभारतीच्या अंतर्गत आज अनेक संस्था कार्य करत आहेत.

**बालवाड:मय निर्मिती:-** वरील शैक्षणिक कार्यासोबतच रवींद्रनाथांनी मुलांसाठी व मुलांच्या जीवनाशी संबंधित अशी कितीतरी गीते कथा नाटके लिहिली मानसशास्त्रीय ग्रंथाचा त्यांनी अभ्यास केला नसेल परंतु ते अलौकिक प्रतिभेचे कवी होते बालकांची मने समजून घेण्याची कलात्मक अंतर दृष्टी त्यांच्यात होती म्हणून त्यांच्या या विशाल वाङ्: मयातून मुलांच्या भावनात्मक विश्वाचे विविध रंगी व विलोभनीय दर्शन घडते. म्हणून त्यांची बालवाडी निर्मिती मुलांना तर लाभदायक ठरलीच परंतु बालमनाचा विचार करणारे शिक्षणशास्त्रज्ञ व बालवाड्मयाचे लेखक यांनाही प्रेरक व मार्गदर्शक ठरली आहे.

**शैक्षणिक कार्याचे श्रेष्ठत्व:-**

रवींद्रनाथ हे केवळ तत्वचिंतक नव्हते ते कृतीविर होते आपले शैक्षणिक तत्त्वज्ञान प्रत्यक्षात उतरवून त्याची त्यांनी त्या तत्त्वांची व्यवहार्यता व उपयुक्तता सिद्ध करून दिली. रवींद्रानी शिक्षणाच्या सर्वच अंगावर मौलिक विचार प्रकट करून शिक्षण विषयक साहित्यात फार मोठी भर घातली आहे शिक्षण क्षेत्रात त्यांनी केलेल्या अनेक प्रयोगांमध्ये शिक्षणातील शाश्वत विकास पहावयास मिळतो.

**संशोधनाचे निष्कर्ष :-**

रवींद्रनाथ टागोरांच्या मते ,विद्यार्थ्यांच्या वर्तनात सुयोग्य बदल घडून येण्यासाठी शाश्वत विकासाच्या शिक्षणात जास्तीत जास्त विद्यार्थीकेंद्रित अध्यापनाची आवश्यकता आहे. त्यामुळे अध्यापकाने अध्यापन करताना बुद्धीमंथन, प्रश्नोत्तर पद्धती, प्रकल्प पद्धती, संशोधन पद्धती, गटचर्चा पद्धती, निसर्गाच्या सानिध्यात शिक्षण ,आशय आधारित क्षेत्रभेटी ,कृती अधारित अध्ययन इत्यादी पद्धतींचा वापर करावा. तसेच विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनासाठी प्रेरित , त्यांच्यात स्वतंत्र विचारशक्ती व दूरदृष्टीचा विकास होण्यासाठी प्रयत्न , विद्यार्थांमध्ये सामाजिक व व्यावसायिक कौशल्ये विकसित होण्यास प्रयत्न करावा. रवींद्रनाथ टागोरांचे शिक्षणातील शाश्वत विकासातील योगदान व शाश्वत विकासातील दृष्टिकोन आजच्या २१ व्या शतकात उपयुक्त यावर आधारित शिक्षणप्रक्रियेतील शाश्वत विकासाचा वारसा जपत आजची अनेक गुरुकुल अध्ययन अध्यापनाचे कार्य करत आहेत व NEP २०२० नुसार अभ्यासक्रमामध्ये निसर्गातून शिक्षण व प्रत्यक्ष कृती यावर भर दिलेला दिसून येतो .

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

**शिफारशी :-**

**संशोधिकेने पुढील शिफारशी मांडल्या आहेत.**

१ .आजच्या शिक्षणामध्ये शाश्वत विकासासाठी रवींद्रनाथ टागोरांचे विचाराप्रमाणे स्तरामध्ये विविध शिक्षण पध्द्तीचा उपयोग करण्यात यावा .

२. आजच्या शिक्षणामध्ये शाश्वत विकासासाठी रवींद्रनाथ टागोरांचे विचाराप्रमाणे अध्ययन -अध्यापन दर्जेदार व आशय योग्य प्रकारे समजण्यासाठी विविध शैक्षणिक पद्धती व निसर्ग यांचा समन्वय साधत विविध कार्यनीती अमलात आणाव्यात.

**संदर्भ :-**

*Best J.W.,Khan j.,Jha A.R.(2017);Research in Education;pearson in South Asia.*

*कुंडले म.बा (फेब्रु २०१२ ) ; शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र ;पुणे:श्री. विद्या प्रकाशन.*

**Website References:-**

*https://maharashtratimes .com 19 march 2023 ,Retrieved on 25 Dec2023*

*https://marathivishshwkosh .org.13 sep 2022, Retrieved on 21 Dec2023*

*https://allforyou.in 10 jan 2023, Retrieved on 23 Dec2023*

*https://mpscplanner.com.25july2021,Retrieved on 20 Dec2023*

*Cite This Article:*

***डॉ. देसाई प्र. स. व सौ. भालकर सं. सं.* (2024).** *रवींद्रनाथ टागोर आणि शिक्षणक्षेत्रातील शाश्वत विकास.* In Educreator Research Journal: Vol. XI (Number II, pp. 240–245). ERJ. https://doi.org/10.5281/zenodo.10908198